Publication: M·Times
Date: 29/2/2020
Page: 5
Column: 1-3

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । शनिवार, २९ फेब्रुवारी २०२०

# मुंबईतील २,२६९ शाळांत 'स्वच्छाग्रह'

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

## स्वच्छता संस्कृती निर्माण करण्यासह सुरक्षित वातावरण करण्याबाबत मार्गदर्शन

मुंबईतील २२६९ शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षेसह स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी अदानी फाऊंडेशन व अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) कडून 'स्वच्छाग्रह' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये 'स्वच्छतेची संस्कृती निर्माण' करण्यासह मुलांसाठी सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी यात मार्गदर्शन दिले जात आहे. या कार्यक्रमादरम्यान सुरक्षितता व स्वच्छाग्रह या विषयावर प्रशिक्षण सत्रे, पथनाट्ये आदी घेतली जात आहेत. बुधवार, २६ फेब्रुवारीला या उपक्रमाचा समारोप होणार आहे.

कचरा इतस्ततः फेकण्याची वृत्ती व वर्तन बदलण्याच्या गरजेवर भर देत अदानी फाऊंडेशन १९ राज्यांमध्ये स्वच्छतेची संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न करत आहे. १ लाखांहून अधिक स्वच्छाग्रहींच्या मदतीने अदानी फाऊंडेशन दर महिन्याला २६.५० लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. ५५०० शाळांतील विद्यार्थी व शिक्षकांच्या माध्यमातून ही चळवळ १२ कोटी ५० लाख लोकांपर्यंत पोहोचली आहे. या कार्यक्रमाचा भर कचरा व्यवस्थापन व कचरा फेकण्याची वृत्ती, स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता व शौचाबाबतच्या सवयी, या चार विषयांवर आधारित आहे. याखेरीज कोणत्याही प्रकारचे विद्युत अपघात, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, आग यांपासून सुरक्षितता; वाहतूक सुरक्षितता; पेयजलाची सुरक्षितता आणि अन्य आपत्कालीन परिस्थितींपासून सुरक्षितता यावरही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले जात आहे. फाऊंडेशनच्या विश्वस्त शिलिन आर. अदाणी यांचे या उपक्रमाला मार्गदर्शन आहे.

